# विधी व्यवसाय

विधी व्यवसायाचा मानवी जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. किंबहुना मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्र विधी व्यवसायाच्या कक्षेत येते. वकीलांकडून मानवी सभ्यता चालवली जाते असे म्हणतात याचे कारण कोणत्याही समाजातील संस्कृतीचे रक्षण करण्याचे कार्य तोच करत असतो. म्हणून त्यास संस्कृतीचा रक्षक असेही म्हणतात. कोणत्याही लोकशाहीप्रधान समाजव्यवस्थेचा कणा ही त्या समाजातील न्यायव्यवस्था ही असते. वकील हा न्यायव्यवस्थेतील सर्वात महत्वाचा घटक आहे. वकीलांची भूमिका ही अनेक कारणांनी महत्वाची मानली जाते. बहुसंख्य प्रशासक किंवा लोकप्रतिनिधी वकीलच असतात. देशातील महत्वाची पदे भूषविणाऱ्या व्यक्ती या प्रामुख्याने कायद्याच्या पदवीधारक असतात. मोठमोठ्या उद्योग समुहास वकीलांची सेवा अत्यंत गरजेची असते एवढेच नाही तर आपल्या दैनंदिन जीवनातही वकीलांची सेवा अत्यावश्यक असते.

वर पाहिल्याप्रमाणे मानवी जीवनात वकीलांची भूमिका अतिशय महत्वाची असते. त्यामुळे समाजाच्या या व्यवसायाकडून फार मोठ्या अपेक्षा असतात. या व्यवसायाचे देखील एक नीतिशास्त्र असते. प्रत्येक वकीलाने त्यानुसार वागावे अशी माफक अपेक्षा समाज करत असतो. विधी नीतीशास्त्र म्हणजे वकीलांचे कोणते आचरण चांगले किंवा वाईट असे नीतिनियम सांगणारे शास्त्र होय. परंतू बदलत्या काळानुसार विधी व्यवसायातदेखील अनैतिकता निर्माण झाल्या. त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे सांगता येते.

① अतिरिक्त वाढती संख्या – कोणत्याही व्यावसायिकांची संख्या ही एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात व मर्यादित स्वरूपात असेल तर त्या व्यवसायाची सेवा व्यवस्थित मिळू शकते. परंतू शिक्षणाची व प्रवेश पात्रतेसंबंधीची अट याविषयी अनिश्चित धोरण अवलंबिल्यामुळे या व्यवसायात प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत गेली. ज्ञान आणि चारित्र्य या दोन गोष्टी उच्च प्रतीची व्यावसायिक सेवा देऊ शकतात. परंतु त्याच गोष्टींचा अभाव अलीकडील काळात झाल्याने अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या.

② व्यवसायात गैरमार्गांचा प्रवेश – वकीलांची अतिरिक्त संख्या हेच या समस्येचे महत्वाचे कारण आहे. कारण जीवघेणी स्पर्धा वाढल्याने वकीलांनी सर्रासपणे गैरमार्गांचा अवलंब सुरू केला. गैरमार्गाने अशीलांचा शोध घेणे, प्रसंगी त्यासाठी दलालांचा वापर करणे, कागदपत्रातील दोषस्थळांचा फायदा घेणे, अधिक सेवाशुल्क, प्रकरणे जाणिवपूर्वक लांबवणे, विरोधी पक्षकारांशी हातमिळवणी करणे, न्यायाधीशास मॅनेज करणे, धनिकांना सेवा देणे असे कितीतरी गैरप्रकार या व्यवसायात निर्माण झाले आहेत.

③ व्यवसायाचे व्यापारीकरण – अर्थार्जन करणे हा व्यवसायाचा नव्हे तर व्यापाराचा मुख्य हेतू आहे. परंतु अलीकडील काळात वकिली व्यवसाय हा देखील व्यापारीकरणाच्या मार्गाने जाताना दिसून येतो. अर्थप्राप्ती हे एकमेव उद्दिष्ट वकिली व्यवसायाचे झाले आहे, ज्या प्रकरणांमध्ये अधिक अर्थप्राप्ती आहे अशीच प्रकरणे स्वीकारण्याकडे बहुतेकांचा कल होताना दिसून येत आहे. आयकर, विक्रीकर संदर्भातील प्रकरणे स्वीकारणे, गुन्हेगारांची प्रकरणे, उद्योग समुहांची प्रकरणे अतिरिक्त अर्थप्राप्ती करून देणारी असल्याने ती स्वीकारण्याकडेच बहुतेकांचा कल असतो.

④ जुन्या पद्धतीचे सातत्य – न्यायपद्धती ही काळाच्या व बदलत्या समाजाच्या गरजेनुसार बदलणे आवश्यक असते. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसून येत नाही. किमान आपल्या समाजात तरी जुन्या पद्धतीचे सातत्य आजही आहे

स्वातंत्र्यानंतर ब्रिटिशांनी सुरू केलेली न्यायव्यवस्था आजही तशीच अस्तित्वात आहे. साठ-सत्तर वर्षांपूर्वी निर्माण केलेले कायदे आज कालबाह्य झालेले आहेत. त्यामुळे ते आज विसंगत ठरत आहेत. या पद्धतीमुळे वर्षानुवर्षे प्रकरणे निकाली निघत नाहीत.

(५) सामाजिक जाणिवेची उणीव – सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून समाजाच्या त्यातल्या त्यात गरजूंची सेवा करणे हे व्यवसायाचे मुख्य उद्दिष्ट आहे. तरी पण ही भावना आज कोणत्याही वकिलांच्या मनात राहिलेली दिसून येत नाही. ही वृत्ती केवळ गल्लाभरूच नव्हे तर प्रतिष्ठित वकिलांची सुद्धा झाली आहे. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देऊन आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा राखणे हे मूलभूत कर्तव्य वकील मंडळी पूर्णपणे विसरलेली दिसून येते.

अशा अनेक अनैतिकता विधी व्यवसायात निर्माण झालेल्या दिसून येतात.

विधी संहिता – इतर व्यवसायांप्रमाणे या व्यवसायासाठी देखील एक निश्चित अशी आचार संहिता आहे. तिचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येते.

1) न्यायसंस्थेचे पावित्र्य राखणे हे वकिलांचे प्रमुख कर्तव्य आहे.
2) एखाद्या व्यक्तीस गुन्हेगार ठरवण्यापेक्षा तिला न्याय मिळवून देणे हे उद्दिष्ट असले पाहिजे.
3) सेवा शुल्काच्या संदर्भात निश्चित धोरण असले पाहिजे.
4) कोणत्याही गैरमार्गांचा अवलंब करणाऱ्या व्यक्तींशी संबंध टाळले पाहिजेत.
5) न्यायप्रक्रियेत अनावश्यक राजकीय हस्तक्षेप टाळला पाहिजे.
6) गैरमार्गाने अशिलांना आकर्षित करणे कटाक्षाने टाळले पाहिजे.
7) सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेने समाजाला सेवा दिली पाहिजे. समाजकल्याणकारक उपक्रमात सहभाग नोंदवला पाहिजे.

ही परिपूर्ण यादी नाही. ही केवळ काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. यांचे पालन केले तर या व्यवसायातील समस्या दूर होण्यास निश्चित मदत होईल.

***